मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पुणे मेट्रोची सेवा 9 तास बंद राहणार

## धुळवडीनिमित्त सकाळी सहा ते दुपारी तीन वाजेपर्यंत मेट्रोची सेवा बंद राहणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

वनाझ ते रामवाडी आणि निगडी ते स्वारगेट या 33 किलो मीटरच्या पुणे मेट्रोला पुणेकर नागरिकांचा दिवसेंदिवस चांगला प्रतिसाद मिळत आहे. मेट्रोमध्ये अधिकाधिक नागरिकांनी प्रवास करावा, यासाठी पुणे मेट्रोकडून विविध उपक्रम हाती घेतले जात आहे. यामुळे दिवसेंदिवस लक्षणीय प्रवासी संख्या वाढताना दिसत असून दररोज सरासरी दीड लाखाच्या घरात मेट्रोने नागरिक प्रवास करित आहे.



पण दररोज मेट्रोने प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी महत्वाची माहीती समोर येत आहे. धुळवडीनिमित्त सकाळी सहा ते दुपारी तीन वाजेपर्यंत पुणे मेट्रोची सेवा बंद राहणार आणि त्यानंतर तीन ते रात्री अकरा वाजेपर्यंत मेट्रो सुरू राहणार आहे.याबाबत पुणे मेट्रोकडून कळविण्यात आली आहे. याबाबत नागरिकांनी नोंद घेण्यात यावी,असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

### सुरक्षा व्यवस्था

पुणे मेट्रोने सर्व स्थानके आणि प्लॅटफॉर्मवर सुरक्षा व्यवस्था कडक करण्याची योजना आखली आहे. रविवारी पुणे महानगरपालिका (पीएमसी) स्थानकाजवळील रुळांवर चढून राष्ट्रवादी-सपाच्या निदर्शकांनी मेट्रोचे कामकाज दोन तास थांबवल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले की, आर्टिफिशियल इंटेलिजन्स/मशीन लर्निंगचा वापर करून सुरक्षा वाढवली जाईल. "जर कोणी मेट्रो प्लॅटफॉर्मवर पिवळी रेषा ओलांडली किंवा ट्रॅकवर उडी मारली तर यामुळे आम्हाला सतर्कता मिळेल. पुढील तीन ते सहा महिन्यांत हे अंमलात आणू," असे ते म्हणाले.

### मेट्रो सेवेची वेळ :

- » सकाळी 6 ते दुपारी 3: मेट्रो सेवा बंद राहील.
- » दुपारी 3 ते रात्री 11: मेट्रो सेवा नेहमीप्रमाणे सुरू राहील.

### प्रवाशांना परतावा

» सोमवारी, पुणे मेट्रोचे कार्यकारी संचालक (जनसंपर्क आणि प्रशासन) हेमंत सोनवणे यांनी सांगितले की, सेवा खंडित झाल्यामुळे बाधित झालेल्या 312 प्रवाशांना ₹ 5,303 चा परतावा देण्यात आला आहे. सुमारे 4,000 प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागला.

---

# साप्ताहिक व सार्वजनिक सुटीच्या दिवशीही भरता येणार मालमत्ता कर

## महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने कर वसुलीची कार्यवाही सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने कर वसुलीची कार्यवाही सुरु आहे. अर्थसंकल्पातील उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी केवळ १८ दिवसाचा कालावधी शिल्लक आहे. हीच बाब लक्षात घेऊन महापालिकेची मुख्य कार्यालय तसेच १८ विभागीय कर संकलन कार्यालय यापुढे शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुटीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात मालमत्ता धारकांना कर भरण्यासाठी १८ विभागीय कार्यालये कार्यान्वीत आहेत. कराचा भरणा करण्यासाठी ऑनलाइन पध्दतीने कर भरण्याची सुविधा विभागीय कर संकलन कार्यलयामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आत्तापर्यंत ८३१ कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. कर संकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, नळ कनेक्शन खंडित करणे, जप्त मालमत्तांचा लिलाव करणे, यासारख्या कठोर कारवाया केल्या जात आहेत. नागरिकांना कर भरण्याचे आवाहन करण्यासाठी करसंकलन विभागाकडून टेलिकॉलिंगच्या माध्यमातून आवाहन केले जात आहे.




नागरिकांनी शनिवारी व रविवारी महानगरपालिकेकडून ८८८८००६६६६ सदर क्रमांकावरुन आलेले फोन अधिकृत असून त्याचबरोबर, @CP-PCMCPT @CP-PCMCWT या हँडलवरुन आलेले एस.एम.एस अधिकृत समजावेत, असे कर संकलन विभागाकडून सांगण्यात आले आहे. नागरिकांना कर भरण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी कर संकलन विभागाच्या वतीने विशेष खबरदारी घेतली जात आहे.

शनिवार आणि रविवार महापालिकेला सुट्टी असली तरी ३१ मार्चपर्यंत या दोन्ही दिवशी कर संकलन कार्यालये सुरुच ठेवण्यात येणार आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी कर भरण्यासाठी वेळ वाढविण्यात आली आहे. दि. ३१ मार्चपर्यंत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत कॅश काऊंटर सुरू ठेवण्यात येणार आहेत, याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे.

### करसंकलन विभागाचा निर्णय

» चालू आर्थिक वर्ष संपायला काहीच दिवस बाकी आहेत. करसंकलन विभागाकडून करवसुलीसाठी विविध माध्यमातून आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी शहरातील १८ विभागीय कार्यालये व कॅश काऊंटर्स साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीसुध्दा सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शहरातील करदात्यांनी मालमत्ताकराचा भरणा करुन शहराच्या विकासामध्ये हातभार लावावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जाभंळे – पाटील यांनी केले आहे.

# सावधान...महापालिका करणार एक लाखाचा दंड!

## होळीसाठी शहरात वृक्षतोडीचे प्रकार : आळा घालण्यासाठी महापालिकेने कठोर पावले उचलली

**पुणे | प्रतिनिधी**

होळीसाठी शहरात वृक्षतोडीचे प्रकार होतात. याला आळा घालण्यासाठी महापालिकेने कठोर पावले उचलली आहेत. होळीसाठी वृक्षतोड करताना आढळल्यास संबंधित नागरिकांना एक लाख रुपयांचा दंड केला जाणार आहे.

शहरात गेल्या काही वर्षांमध्ये होळीसाठी सर्रास झाडे तोडण्याचे प्रकार केले जात असल्याचे समोर आले आहे. याला आळा घालण्यासाठी महापालिकेने दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. शहरात आज, १३ मार्चला होळी साजरी केली जाणार आहे. हा सण दर वर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. होळीसाठी शेणाच्या गोवऱ्या, तसेच वाळलेल्या लाकडांचा, झाडाच्या पालापाचोळ्याचा वापर केला जातो. मात्र, काही ठिकाणी झाडे बेकायदारीत्या तोडून ती विक्रीसाठी ठेवली जातात.



शहरालगत असलेल्या वन विभागाच्या हद्दीमधील, तसेच नदीकाठ आणि आजूबाजूच्या भागातील झाडे होळीसाठी तोडली जातात. याबाबतच्या तक्रारी महापालिकेकडे आल्यानंतर महापालिका प्रशासनाने झाडे तोडून त्याचा वापर होळीसाठी केल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम २०२१ या कायद्यानुसार, कोणतीही परवानगी न घेता झाडे जाळणे, तोडणे किंवा कोणत्याही प्रकारे झाडाला हानी पोहचविणे, असे कोणतेही कृत्य करणे हा गुन्हा आहे. त्यामध्ये एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या दंडाची तरतूद आहे. याचा आधार घेत महापालिकेने झाडे तोडणाऱ्याला एक लाख रुपयांचा दंड करण्याचा इशारा दिला आहे.

बेकायदा वृक्षतोडीचे प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्याबाबत तक्रार करण्यासाठी महापालिकेने विशेष हेल्पलाइन क्रमांक सुरू केले आहेत. या क्रमांकांवर नागरिकांना तक्रार करता येईल. तक्रार आल्यानंतर तिची शहानिशा केली जाईल. तथ्य आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करून त्याच्याकडून दंड घेतला जाईल, असे महापालिकेतील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

पुणे महापालिकेचे मुख्य उद्यान अधीक्षक अशोक घोरपडे म्हणाले की, वृक्षतोड करण्यास बंदी आहे. नवीन कायद्यामध्ये झाडे तोडल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करून त्याच्या विरोधात न्यायालयात खटला चालविला जातो. या कायद्यानुसार एक लाख रुपयांचा दंड होऊ शकतो. बेकायदा वृक्षतोड होत असल्यास नागरिकांनी हेल्पलाइनवर तक्रार नोंदवावी.

### उपनगरांमध्ये वापर अधिक

» पुणे शहराच्या मध्यवर्ती भागांसह उपनगरांमध्ये होळी मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. होळी करण्यासाठी झाडे तोडण्याचे प्रकार हे उपनगरांमध्ये अधिक घडतात. हडपसर, कात्रज, लोहगाव, वडगाव शेरी या भागासह सिंहगड रस्त्यांवरही हे प्रकार अधिक प्रमाणात घडण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने नियोजन केले जात असल्याचे महापालिकेतील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### येथे करा तक्रार

» विनापरवाना वृक्षतोडीचे प्रकार घडत असल्यास किंवा घडलेले असल्यास याची माहिती नागरिकांनी महापालिकेला द्यावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे. तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांना संपर्क साधता यावा, यासाठी हेल्पलाइनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांना १८००१०३०२२२ या टोल फ्री क्रमांकावर, ९६८९९०००२ या व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर तक्रार करता येईल. तसेच ९६८९९३८५२३, ९६८९९३००२४ या मोबाइल क्रमांकावरही तक्रार करता येणार आहे.

# ‘पीएमपी’तून प्रवास करताना आता थांब्याची माहिती समजणार

## पीएमपीएमएल बसमध्ये ‘पुढील थांबा उद्घोषणा’ ही स्वयंचलीत प्रणाली सुरू करण्याचा निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातल्या प्रवाशांना सुलभ प्रवासाचा आनंद घेता यावा म्हणून पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) बसमध्ये ‘पुढील थांबा उद्घोषणा’ ही स्वयंचलीत प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ज्येष्ठ, अपंग, दृष्टीहीन, महिला प्रवाशांना या सुविधेचा फायदा होणार आहे. त्यानुसार ‘पीएमपी’च्या चार हजारांहून अधिक थांब्यांचे उद्घोषणा करणारे ध्वनीमुद्रणाचे (ऑडिओ रेकॉर्डींग) काम अंतिम टप्प्यात आहे. लवकरच या यंत्रणेची चाचणी होणार असल्याची माहिती ‘पीएमपी’ प्रशासनाकडून देण्यात आली.




सार्वजनिक वाहतूक सेवेत मेट्रो, रेल्वे, आणि विमान प्रवाशांसाठी स्वयंचलित घोषणांची सुविधा उपलब्ध हे, मात्र अद्याप ‘पीएमपी’मध्ये या सुविधेचा अभाव आहे. त्यामुळे अनेकदा दृष्टिहीन, अपंग आणि वृद्ध प्रवाशांमध्ये गोंधळ निर्माण होणे, नियोजित थांबा ओळखण्यात अडचणी निर्माण होणे, ज्यामुळे थांबे चुकणे, असे प्रकार होत आहे. प्रवाशांची गैरसोय होत असून विशेषत: परगांवावरून आलेल्या प्रवाशाना शहराची ओळख नसल्याने त्यांना नियोजित ठिकाणी जाताना सहप्रवाशांवर अवलंबून रहावे लागत आहे. या नवीन प्रणालीमुळे, त्यांच्या दैनंदिन प्रवासात अधिक स्वातंत्र्य मिळेल. याव्यतिरिक्त, वृद्ध प्रवाशांना ज्यांना बस मार्ग निर्देशक वाचण्यात किंवा अपरिचित थांबे ओळखण्यात अडचण येत असेल त्यांना देखील या प्रणालीचा मोठा फायदा होणार आहे.

अनेकदा चालक आणि प्रवाशांमध्ये तसेच सहप्रवाशांसोबत वादविवाद असे प्रकार रोखण्यासाठी ही प्रणाली सुरू करण्यात येणार आहे. प्रवाशांची चिंता दूर करून सुरभ प्रवासाच्या अनुषंगाने ‘पीएमपी’मध्ये सुधारणा करण्यासाठी या सुविधेचा अवलंब करण्यात येत असल्याचे ‘पीएमपी’ प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### अत्याधुनिक यंत्रणेचा अवलंब

» ‘पीएमपी’च्या बसला जीपीएस सुविधा बसविण्यात आली आहे. संबंधित बस कोणत्या मार्गावरून धावत आहे, याची मोबाईल अ‍ॅपद्वारे माहिती प्राप्त करता येते. याच जीपीएस प्रणालीमध्ये नवीन ‘स्वयंचलीत थांबा उद्घोषणा प्रणाली’ जोडण्यात आली आहे. उद्घोषणा प्रणालीमध्येही साडेचार हजारांहून अधिक थांब्यांचे ध्वनीमुद्रण एकाच आवाजात करण्यात आले आहे. दोन्ही प्रणाली स्वयंचलीत असल्याने वाहकाला पुढचा थांबा कोणता आहे, हे सांगण्याची गरज भासणार नाही. तसेच आधुनिक ध्वनीक्षेपक यंत्रणा बसमध्ये बसविण्यात येईल. ज्या ठिकाणावरून बस मार्गस्थ होईल त्या मार्गावरील पहिला थांबा येण्यापूर्वीच थांब्याची उद्घोषणा होईल. त्यानुसार कालबद्धताही सुनिश्चित करण्यात आली आहे.

# प्रशासकीय राजवटीचे चौथ्या वर्षांत पदार्पण

## पिंपरी चिंचवड महापालिकेतील नगरसेवकांचा कार्यकाळ संपून प्रशासकीय राजवट आली, प्रशासकीय राजवटीला तीन वर्षे पूर्ण होऊन चौथ्या वर्षांत पदार्पण होत आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेतील नगरसेवकांचा कार्यकाळ संपून प्रशासकीय राजवट आली. आज प्रशासकीय राजवटीला तीन वर्षे पूर्ण होऊन चौथ्या वर्षांत पदार्पण होत आहे. या प्रशासकीय राजवटीमध्ये लोकोपयोगी कामे कासवगतीने सुरू आहेत. तर, महापालिकेच्या तिजोरीवर ताण टाकणाऱ्या अनावश्यक कामांचा सपाटा सुरू आहे. यामुळे नागरिकांसाठीच्या लोकोपयोगी कामांना घरघर लागली असून शहराचा विकास खुंटला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील नगरसेवकांचा पाच वर्षाचा कार्यकाळ १३ मार्च २०२२ रोजी संपुष्टात आला. महाविकास आघाडी सरकारने तत्कालीन महापालिका आयुक्त राजेश पाटील यांचीच प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी चार महिने प्रशासक म्हणून काम पाहिले.

राज्यात सत्तांतर झाल्यानंतर पाटील यांची बदली झाली. त्यांच्याजागी शेखर सिंह यांची आयुक्त आणि प्रशासकपदी १६ ऑगस्ट २०२२ रोजी नियुक्ती झाली. गेल्या तीन वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत कामे गतीने होत नाहीत. प्रशासक कोणाला दाद देत नाहीत. मूलभूत कामे होत नाहीत अशा तक्रारी नागरिक करत आहेत. महापालिकेचा कारभार संथ झाला आहे. अधिकारी वारंवार दौरा व सुट्टीवर असल्याने नागरिकांची कामे होत नाहीत. ड्रेनेज, पाणी, रस्त्यांची दुरवस्था या कामांसाठी क्षेत्रीय कार्यालये किंवा महापालिकेत वारंवाच चकरा माराव्या लागत आहेत. तर, मोठ्या खर्चाची कामे राजकीय दबावाने तातडीने मार्गी लागत असल्याचे चित्र आहे.

प्रभागामधील छोटी-मोठी कामे करण्यासाठी नगरसेवकांना नागरिक सांगत असत. नगरसेवक आपल्या अधिकारांचा वापर करून सातत्याने पाठपुरावा करत अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून कामे करून घेत. मात्र, आता प्रशासकीय राजवटीत अधिकाऱ्यांना वारंवार कामे सांगून देखील ते करत नाही. बैठका, दौरा, कार्यक्रम, साईट व्हिजिट, व्हिडिओ कॉन्फरन्स आदी कारणे सांगत अधिकारी हात वर करीत असल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत. त्यामुळे महापालिकेत आपले हक्काचे नगरसेवक असावेत, अशी भावना नागरिक बोलून दाखवत आहेत.

### जनसंवादच्या नावे नागरिकांची दिशाभूल

» नगरसेवक नसल्याने नागरिकांच्या समस्या, अडचणी व तक्रारी समजावून घेण्यासाठी तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयात दर सोमवारी जनसंवाद सभा सुरू केली होती. आयुक्त शेखर सिंह यांनी महिन्यातून केवळ दोन दिवसांवर जनसंवाद सभा आणली. मात्र, या जनसंवाद सभेत मांडलेल्या तक्रारी सुटत नसल्याचे वास्तव आहे. तर अलिकडे या सभेचे चित्रीकरण करण्यावर देखील या बंदी घातली आहे.

### प्रशासकीय राजवटीतील ढिम्म कारभार

» नदीसुधार प्रकल्प सुरू करण्यात अपयश आल्याने नदीची गटारगंगा.
» हॉकर्स झोन सुरू नाही
» पदपथ मोकळ्या जागांवर कचरा
» आंद्रा व भामा-आसखेड पाणी योजनेचे काम कासवगतीने
» पवना बंद जलवाहिनी योजना रखडली.
» मुदत संपूनही स्मार्ट सिटीतील सीसीटीव्ही कॅमेरे, फायबर केबल नेटवर्किंग, जीआयएस मॅपिंग सर्वेक्षण, स्मार्ट वॉटर मीटर यासह अनेक प्रकल्प अपूर्ण.
» सारथी हेल्पलाइन, व्हॉट्सअॅपवरील तक्रारीवर कारवाई न करताच बंद

### अधिकारी, कर्मचाऱ्यांचा बेशिस्तपणा वाढला

» आयुक्त महापालिकेमध्ये उपस्थित नसतात. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना देखील त्यांचा धाक राहिला नाही. उपायुक्त, सहायक आयुक्त, शहर अभियंता, सहशहर अभियंता, कार्यकारी अभियंता याशिवाय कर्मचारी नागरिकांना वेळ देत नाही. अधिकाऱ्यांनी ठराविक वेळ नागरिकांना द्यावा यासाठी प्रशासकांनी आदेश काढले आहेत. मात्र, त्याचेही पालन होत नाही. एकूणच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा बेशिस्तपणा वाढला आहे.

# ग्रामीणची ठाणी आयुक्तालयास जोडण्यास गृहविभागाचा नकार?

## मावळमधील पुणे ग्रामीणची चारही ठाणी पुणे ग्रामीण पोलीस दलाकडे राहण्याची शक्यता




**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील वडगाव मावळ, कामशेत, लोणावळा शहर व लोणावळा ग्रामीण या चार पोलीस ठाण्यांना पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाशी जोडण्याच्या प्रस्तावावर गृह विभाग सकारात्मक नसल्याचे समोर आले आहे. काही दिवसांपूर्वीच अजित पवार यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत लोणावळा शहर आणि ग्रामीण हद्दीत पर्यटकांसाठी नव्याने पर्यटक पोलीस ठाणे सुरू करण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार हा भाग पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीबाहेर राहणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे.

मावळातील वडगाव मावळ, कामशेत, लोणावळा शहर आणि लोणावळा ग्रामीण ही चारही ठाणी पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या अखत्यारित असून मागील अनेक दिवसांपासून ही सर्व ठाणी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाशी जोडली जाणार असल्याची चर्चा आहे. तसा प्रस्ताव गृहविभागाकडे पाठविल्याची माहिती आहे. परंतु सरकारच्या नव्या निर्णयाने हा भाग 'जैसे थे' म्हणजे पुणे ग्रामीण दलाकडे राहील, अशी चिन्हे दिसत आहे.

१५ ऑगस्ट २०१८ रोजी पुणे शहर व पुणे ग्रामीण दलाची विभागणी करून पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यान्वित झाले. सुरुवातीला आयुक्तालयाच्या हद्दीत १४ पोलीस ठाणी होती. त्यानंतर चिखली, रावेत, शिरगाव व म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे मंजूर झाले. काही महिन्यांपूर्वी वाकड, हिंजवडी, पिंपरी आणि भोसरी या पोलीस ठाण्यांचे विभाजन करून नव्याने अनुक्रमे काळेवाडी, बावधन, संत तुकारामनगर व दापोडी पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली. सध्या आयुक्तालयांतर्गत २२ पोलीस ठाणी आहेत.

एकीकडे आयुक्तालय हद्दीतील वाढती गुन्हेगारी रोखण्यात पिंपरी-चिंचवड पोलिसांना अपयश येत असतानाच ग्रामीण हद्दीतील वडगाव, कामशेत, लोणावळा शहर आणि लोणावळा ग्रामीण ही चार ठाणी पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाला जोडण्याचा प्रस्ताव गृह विभागाला पाठविल्याची माहिती समोर आली. या प्रस्तावाला मावळ तालुक्यातून मोठा विरोध झाला होता. त्यानंतर हा प्रस्ताव आता बारगळला असून पुणे ग्रामीण दलाकडे असलेला मावळातील चारही पोलीस ठाण्यांचा कारभार तसाच सुरू राहील, असे बोलले जात आहे.

### आयुक्तालयाकडे अगोदरच अतिभार...

» पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे एकूण क्षेत्रफळ जवळपास ११५ चौरस किमी असून अंदाजे ४० लाख लोकसंख्या आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तालय, पुणे ग्रामीणपेक्षा भौगोलिकदृष्ट्या पिंपरी-चिंचवडची हद्द मोठी आहे. पिंपरी-चिंचवड शहर, बावधन, बालेवाडी, ग्रामीणमधील चाकण, खेड, आळंदी, तळेगाव दाभाडे हा परिसर आयुक्तालयांतर्गत येत आहे. आळंदी-मरकळ, तळवडे, भोसरी, चाकण, हिंजवडी, तळेगाव दाभाडे ही औद्योगिक क्षेत्रे आयुक्तालयाच्या अखत्यारित येतात. सध्या आयुक्तालयाकडे असलेल्या या भागातही पायाभूत सुविधा, 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्यांची कमतरता आहे. तसेच गुन्हेगारी वाढत असून गुन्हेगारांना पकडण्यात अडचणी येतात. अशात नवा भाग आयुक्तालयास जोडल्यास तिथे पिंपरी-चिंचवड पोलीस किती यशस्वी होईल, ही शंका आहे.

# वरवंडच्या व्हिक्टोरिया तलावात पाणीसाठा घटतोय

## तलावावर अवलंबून असणाऱ्या 12 गावांच्या पाणी पुरवठा योजना बंद होण्याच्या मार्गावर आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

मौजे वरवंड (ता. दौंड) येथील ऐतिहासिक व्हिक्टोरिया तलावातील पाणी उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच आटत चालल्याने तलाव कोरडा पडत चालला आहे. तलावावर अवलंबून असणाऱ्या १२ गावांच्या पाणी पुरवठा योजना बंद होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे तलावात नवीन मुठा उजवा कालव्यातून पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत. पाणीटंचाईमुळे कुरकुंभ औद्योगिक वसाहतीवर परिणाम होऊन बारामतीच्या जिरायती भागाला याचा जोरदार फटका बसणार आहे.

वरवंड येथील ऐतिहासिक व्हिक्टोरिया तलाव हा दौंड आणि बारामती तालुक्यातील काही गावांसाठी वरदान समजला आहे. दौंड आणि बारामती तालुक्याच्या जिरायती भागाला पाणी पुरवठा करणाऱ्या जानाई- शिरसाई उपसा सिंचन योजना या व्हिक्टोरिया तलावावर अवलंबून आहेत. दौंड तालुक्यातील खोर, पाटस, वरवंड, कुसेगाव, देऊळगाव गाडा, पडवी, कानगाव, कडेठाण या गावांच्या पाणीपुरवठा योजना या तलावावर अवलंबून आहेत. वरवंड येथील ब्रिटिशकालीन व्हिक्टोरिया तलाव हा दौंड तालुक्याच्या ग्रामीण भागातील शेतकरीवर्गाच्या अर्थकारणाला चालना देणारा व दुष्काळाच्या कालावधीत वरदान ठरणारा आहे. या तलावातून दौंड तालुक्यातील पाटस, कुसेगाव, खोर, पडवी, वरवंड, कडेठाण, देऊळगाव गाडा, कानगाव या 8 गावांना पाणी दिले जाते. सद्य:स्थितीत पाटस, गिरीम हद्दीतील तसेच भिगवण शाखा कालव्याचे सिंचन व्यवस्थापन सुरू आहे.

मात्र, आता उन्हाळ्याच्या दिवसांत तलावातील पाणीसाठा संपत चालला आहे. तलावावर अवलंबून असलेल्या अनेक गावांच्या पाणी पुरवठा योजना बंद पडत आहेत. त्यामुळे अनेक गावाना पाणी टंचाईचा फटका बसला आहे.

पाणीसाठा संपल्यास याचा फटका शेती, अनेक गावांच्या पाणी पुरवठा योजना, अनेक कंपन्यांना बसणार आहे. त्यामुळे तलावात जादा पाणी सोडावे अशी मागणी नागरिक करीत आहेत.

तलावात नवीन मुठा उजवा कालव्यातून पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत. पाणीटंचाईमुळे कुरकुंभ औद्योगिक वसाहतीवर परिणाम होऊन बारामतीच्या जिरायती भागाला याचा जोरदार फटका बसणार आहे.



### 310 एकरांमध्ये विस्तार

» खडकवासला धरणसाखळीतून खरीप, रब्बी व उन्हाळी या तीन आवर्तनांसाठी दौंड तालुक्याला 11.08 टीएमसी पाण्याची तरतूद करण्यात आली आहे. मुठा उजवा कालव्यातून वरवंड येथील तलाव भरण्यात येत आहे. जवळपास 310 एकरांत विस्तार असलेल्या या तलावाची साठवणक्षमता 200 दशलक्ष घनफूट आहे. या तलावाच्या माध्यमातून कुरकुंभ औद्योगिक वसाहत, वायनरी प्रकल्प, जनाई-शिरसाई योजना व दौंड तालुक्यातील इतर गावांबरोबरच बारामती तालुक्याला देखील पाणी पुरविण्यात आले आहे.

### कुरकुंभ एमआयडीसीला फटका

» कुरकुंभ औद्योगिक वसाहतीला देखील पाणी पुरवठा याच तलावावरून केला जातो. तलावातील पाणीसाठा आटल्याने कुरकुंभ औद्योगिक वसाहत, वायनरी प्रकल्पाला होणारा पाणी पुरवठा देखील पूर्ण बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तलावाची पाणी साठवण क्षमता ही दोनशे दशलक्ष घनफुट इतकी आहे. तलावात मोठ्या प्रमाणात पाण्याचा साठा असतो. तलावात पाटबंधारे खात्याकडून पाणी सोडले जाते. मात्र, तलाव कोरडा पडत चालल्याने पाटबंधारे खात्याकडून दखल घेतली जात नाही आहे.

# राजगुरुनगरवासीयांना दिलासा मिळणार का? करवाढीचा मुद्दा विधानसभेत उमटला

## मुद्दा उपस्थित केल्यानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी संबंधित खात्याकडून अहवाल मागवला असून तात्काळ निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राजगुरूनगर नगरपरिषदेने केलेली करवाढ तात्काळ रद्द करावी. या मागणीसाठी सोमवारी (दि. 10) पासून सामाजिक कार्यकर्ते ॲड. दीपक थिगळे यांनी सुरू केले असून त्याचे प्रतिसाद विधानसभा अधिवेशनात उमटले आहे. खेड- आळंदी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी संबंधित खात्याकडून अहवाल मागवला असून तात्काळ निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

आमदार बाबाजी काळे यांनी विधानसभेच्या अधिवेशनात बोलताना म्हणाले, खेड -आळंदी मतदारसंघात तीन नगरपरिषदा आहेत. त्यात राजगुरूनगर नगरपरिषद 2014 मध्ये स्थापन झाली. या तीनही नगरपरिषदांमध्ये पाणी, वीज, सांडपाणी, आरोग्य, कचरा आदी जीवनावश्यक सुविधांचा अभाव आहे. त्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागते. नवीन सुधारणा नसल्याने अनेक समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागते. तथापी राजगुरूनगर नगरपरिषदेने करवाढ केली आहे.

त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर मोठा आर्थिक भार आला येत आहे पहिल्या सुविधा द्या, मग नियमाप्रमाणे करवाढ करावी. याबाबत मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री पालकमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. संबंधित विभागा चे मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे. उपोषण मागे घेतलीम असे आश्वासन मिळावे अशी मागणी केली. खेड- आळंदी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी संबंधित खात्याकडून अहवाल मागवला असून तात्काळ निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. दरम्यान, उपोषणकर्ते ॲड. दीपक थिगळे आणि शहरातील युवकांनी जो पर्यंत करवाढ रद्द होत नाही त्याबाबत लेखी उत्तर दिले जात नाही तोपर्यंत उपोषण मागे न घेण्याचा निर्णय घेतला आहे.




### मंत्री शंभूराजे देसाई म्हणाले की...

» आमदार बाबाजी काळे यांनी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र दिले आहे. करवाढ रद्द करण्याबाबत राजगुरूनगर येथे उपोषण सुरू आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरविकास प्रशासनाला आदेश दिले आहेत. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नगरविकास 2 या विभागाचे प्रधानसचिव यांच्याकडून तातडीने अहवाल घेण्याच्या सूचना मला दिल्या आहेत. संबंधित विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कारवाई केली जाईल. जे उपोषणाला बसले आहेत त्यांनी उपोषण सोडावे अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर तात्काळ निर्णय घेतला जाईल असे सांगितले.